दै. गोदातीर दि. 04-10-2024



# २३ लाख रुपयांचे मोबाईल हस्तगत; सायबर शाखेची कारवाई



**नांदेड** - जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणांहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पो. स्टे. सायबर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेल, स्था.गु. शा. व नांदेड जिल्ह्यातील सर्व पोस्टेचे पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली होती.

नांदेड येथील पोलीस स्टेशनचे व स्थागुशाच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जावून नांदेड जिल्ह्यातील एकूण १५० मोबाईल किंमत २३ लाख ४० हजार ५०० रुपयाचे हस्तगत केले. त्यांचे गुरुवार, दि. ३ रोजी एकत्रितरीत्या पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शोध झालेल्या म ोबाईल क्रमांकाची माहिती नांदेड पोलीस दलाचे वेबसाईटवर टाकण्यात आली आहे. त्यापैकी नागरिकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा क्रमांक ओळखून सायबर पो.स्टे. नांदेड येथून मोबाईल घेवून जाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.